नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३०४ Issue - 304 | वार गुरुवार दि. २६ मार्च २०२६ Blow- Thursday Date 26 March 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# देशामध्ये १०० विमानतळ, २०० हेलीपॅड उभारणार

## उडान २.० योजनेचा विस्तार; केंद्र मंत्रिमंडळाचा मोठा निर्णय




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बुधवारी झालेल्या बैठकीत देशाच्या विमान वाहतूक, इमिग्रेशन आणि पर्यावरणाशी संबंधित अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. या निर्णयांमध्ये देशभरात १०० नवीन विमानतळ उभारण्यास मंजुरी, उडान २.० योजनेचा विस्तार, तसेच परदेशी नागरिकांच्या व्हिसा आणि ट्रॅकिंग प्रणालीची योजना २०३१ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

प्रत्येक विमानतळासाठी सरासरी सुमारे १०० कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, या प्रकल्पासाठी सरकारने १२ हजार १५९ कोटी रुपयांचा बजेट निश्चित केला आहे. हे विमानतळ चॅलेंज मोडमध्ये उभारले जाणार आहेत. म्हणजेच, ज्या राज्य किंवा शहराकडून जमीन सुरक्षा व्यवस्था, आवश्यक सुविधा लवकर आणि चांगल्या पद्धतीने उपलब्ध करून दिल्या जातील, त्या ठिकाणांना विमानतळासाठी प्राधान्य दिले जाईल.

देशातील लहान शहरांना हवाई सेवेशी जोडण्यासाठी सुरू असलेली उडान योजना आता पुढील १० वर्षांसाठी (२०३६ पर्यंत) वाढवण्यात आली आहे. या योजनेसाठी सरकार २८ हजार ८४० कोटी रुपये खर्च करणार आहे. यामुळे सामान्य नागरिकांसाठी हवाई प्रवास अधिक स्वस्त आणि सुलभ होण्याची अपेक्षा आहे. सरकार देशभरात २०० नवीन आधुनिक हेलीपॅड उभारणार आहे. विशेषतः डोंगराळ भाग, ईशान्य भारत आणि बेट क्षेत्र येथे रस्ते बांधणे कठीण आहे, तिथे हेलिकॉप्टर हा मुख्य वाहतूक पर्याय बनवण्याचा सरकारचा उद्देश आहे. या प्रकल्पासाठी ३ हजार ६६१ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. याशिवाय भारतात तयार होणाऱ्या विमानांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि नवीन विमान खरेदीसाठी ४०० कोटी रुपयांचा निधी ठेवण्यात आला आहे.

### २०३१ पर्यंत व्हिसा आणि इमिग्रेशन ट्रॅकिंग योजना

**भारतामध्ये येणाऱ्या परदेशी नागरिकांच्या व्हिसा, नोंदणी आणि ट्रॅकिंगशी संबंधित आयव्हीएआरटी योजना पुढील ५ वर्षांसाठी, म्हणजे १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०३१ पर्यंत वाढवण्यात आली आहे. या योजनेसाठी १ हजार ८०० कोटी रुपये खर्च करण्यात येणार असून, भारताची इमिग्रेशन आणि व्हिसा प्रणाली अधिक आधुनिक आणि सुरक्षित बनवणे हा यामागील उद्देश आहे.**

# साताऱ्याचे एसपी तुषार दोशींचं निलंबन मागे; नीलम गोऱ्हेंनी दिलेला आदेश सभापती राम शिंदेंकडून रद्द

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष निवडणुकीवरुन भाजप आणि शिवसेनेत जोरदार राडा झाल्याचं पाहायला मिळालं. अधिवेशन काळात विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहात शिवसेना नेते तथा मंत्र्यांनी जोरदार भाषण करत साताऱ्याचे एसपी तुषार दोशींवर कारवाईची मागणी केली होती. त्यानंतर, उपसभापति नीलम गोऱ्हे यांनी तुषार दोशींच्या निलंबनाचे निर्देश दिले. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी उपसभापतींच्या या निर्देशावर कायदेशीर बाजू समाजावत हे निर्देश देण्याच्या अधिकारावर भाष्य केलं होतं. एकीकडे तुषार दोशींच्या निलंबनावर शिवसेना नेते तथा मंत्री ठाम असताना दुसरीकडे उपसभापति नीलम गोऱ्हेंचे आदेश सभापती राम शिंदेंनी (ठरा िहळपवश) रद्द केले आहेत. त्यावरुन, शिवसेना आणि भाजप नेत्यांमध्ये पुन्हा वादावादी होण्याची शक्यता आहे. त्याच पार्श्वभूमीवर सभागृह तहकूब करण्यात आले.

तुषार दोशींच्या निलंबनासंदर्भातील निर्देश आद-ेशावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज सभागृहात काय घोषणा करतात याकडे शिवसेनेचे लक्ष लागले होते. निलंबन मागे घेतल्यास शिवसेनेकडून तीव्र नाराजी नोंदवण्याची शक्यताही वर्तवली जात होती. सातारा जिल्हा परिषद निवडणुकीत पोलीस चुकीच्या पद्धतीने वागल्याचा आरोप सत्ताधारी शिवसेना मंत्र्यांनी केला होता. मात्र, आता सभापतींनी राम शिंदे यांनी उपसभापती नीलम गोरे यांचे एस.पी. तु-षार देशी यांच्या निलंबनाचे दिलेले आदेश कक्षेबाहेर असल्याचं सांगितलं. नीलम गोह्रे यांनी निलंबनाचे आदेश दिले होते ते आदेश सभापती राम शिंदे यांनी मागे घेत आता चौकशीचे आदेश दिले आहेत तर, उपसभापतींना विधिमंडळ परिसरात असलेल्या घटनेबाबत पीठासीन अधिकाऱ्यांना निर्णय देण्याचा अधिकार असतो, असे देखील सभापतीने नमूद केलं. त्यानंतर, शिवसेना मंत्र्यांनी सभागृहात प्रश्न उपस्थित केल्याने गोंधळ निर्माण होऊन सभागृह तहकूब करण्यात आले. दरम्यान, या टोकाच्या वादातून मंत्री किंवा आमदार राजिनामाअस्त्र बाहेर काढणार का? याकडे आता लक्ष लागले आहे.

### विधानपरिषदेचे कामकाज तहकूब



**तुषार दोशींचे निलंबन झाले की नाही? असा सवाल मंत्री शंभुराजे देसाई केला. तसेच, निलंबन केलं की नाही ते सांगावे नाहीतर आम्ही कोर्टात जाऊ, असे शशिकांत शिंदेंनी म्हटले. त्यावर आता बोलणे उचित नाही, असे उत्तर सभापती राम शिंदे यांनी दिले. त्यानंतर, सातारा प्रकरणावरून विधानपरिषदेचे कामकाज अर्धा तास तहकूब करण्यात आले. शिवसेना नेते तथा मंत्री उदय सामतं, शंभुराजे देसाई, शशिकांत शिंदे यांनी आक्षेप घेतला. या आक्षेपानंतर विधानपरिषदेचे कामकाज तहकूब करण्यात आले.**

# दिव्यांग सक्षमीकरण विभागासाठी लवकरच नियमित भरती प्रक्रिया : मंत्री अतुल सावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या सुधारित आकृतीबंधास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. नियमित भरती प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची माहिती मंत्री अतुल सावे यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

### सुधारित आकृतीबंधास मंजुरी

याबाबत सदस्य शशिकांत शिंदे यांनी प्रश्न उप-स्थित केला. तर सदस्य प्रविण दरेकर, संजय केनेकर यांनी उपप्रश्न उपस्थित केले.

मंत्री अतुल सावे म्हणाले, विभागाचे सेव-ाप्रवेश नियम अंतिम टप्प्यात आहेत. नियम तयार झाल्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नियमित पदभरती प्रक्रिया राबविण्यात येईल. सध्या विभागासाठी एकूण २१०५ पदांना मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये मंत्रालयीन स्तरावर ६७ पदे, तर आयुक्तालय व जिल्हास्तरावर १४०२ नियमित आणि ६३६ बाह्यस्त्रोतावरील पदांचा समावेश आहे.

१० जानेवारी २०२५ रोजी पदे प्रतिनियुक्तीने भरण्याची कार्यवाही करण्यात आली. मात्र पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्याने गट-ब व गट-क अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आणि १ मे २०२५ पासून १३ जिल्ह्यांत कार्यालये सुरू करण्यात आली.

त्यानंतर २५ ऑगस्ट २०२५ च्या निर्णयानुसार गट-अ व गट-ब अधिकाऱ्यांकडे जबाबदारी देण्यात येऊन १ सप्टेंबर २०२५ पासून सर्व ३६ जिल्ह्यांत कार्यालये कार्यान्वित झाली असून, मुख्य कार्यकारी अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या म ार्गदर्शनाखाली कामकाज सुरू असल्याचे मंत्री अतुल सावे यांनी यावेळी स्पष्ट केले.

# अजितदादांचा घातपात असेल तर आकाश-पातळ एक करु, कुणाचा बाप असला तरी खोदून काढू, देवेंद्र फडणवीसांचा रोहित पवारांना शब्द

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधिमंडळ अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी आमदार रोहित पवार यांनी सभागृहात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाच्या चौकशीबद्दल प्रश्न उपस्थित केले. अपघात की घातपात यासंदर्भात सुरू असलेल्या चौकशीबाबत सरकार का बोलत नाही, सद्यस्थिती काय आहे. तसेच, महाराष्ट्र सरकारने एफआयआर घेतला नाही, पण कर्नाटक सरकारने गुन्हा दाखल करुन घेतला असेही रोहित पवार यांनी सभागृहात बोलताना आवर्जून सांगितले. त्यानंतर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (ऊर्शींशपवीर ऋरवपर्वीळी) यांनी यासंदर्भात भूमिका मांडली असून रोहित पवारांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. तसेच, अजित दादांचा घातपात असेल तर कोणाचाही बाप असूदे, मुर्दा खोदून काढू असेही ठणकावून सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी अंतिम आठवडा प्रस्तावार उत्तर देताना अगोदर अशोक खरात प्रकरणावर भाष्य केलं. याप्रकरणी, कडक कारवाई केली जाईल असे मुख्यमंत्र्यांनी ठणकावून सांगितले. त्यानंतर, आमदार रोहित पवार यांनी उपस्थित केलेल्या अजित पवारांच्या विमान दुर्घटनेवरही फडणवीसांनी सविस्तर उत्तर दिले. डीजीसीए अहवाल आणि आजपर्यंतच्या तपासाची माहिती दिले. तसेच, अजित दादांचा अपघात हा जर घातपात असेल तर कोणाचाही बाप असूदे, खोदून काढू, सोडणार नाही. कदाचित तुमच्यापेक्षा माझी तीव्रता कमी असू शकते, पण इतकी बोथट नाही की अजित दादांच्या केसमध्ये कोणी कॉन्स्पिरन्सी करेल, तर आम्ही द्याला सोडून देऊ, त्याचा मुदडाही खोदून काढू अशा शब्दात देवेंद्र फडणवीसांनी रोहित पवारांच्या प्रश्नांवर उत्तर देत याप्रकरणी टोकाच तपास करण्याचे ठणकावले.



रोहीत पवार राहूल गांधी यांना भेटले, ऋत्यांनी कर्नाटकमध्ये अपघातासंदर्भाने एफआयर करायला सांगितला. ऋमात्र तसा झिरो एफआयर करता येत नाही, ऋतो चुकीचा आहे. ऋकर्नाटकने राजकीयदृष्ट्या तपास नीट सुरु नाही, यासाठी हा एफआयर दाखल केला आहे. ऋमहाराष्ट्राची मानहानी करण्यासाठी हा एफआयआर केला असेल, तुमच्या मनात शंका ठेवू नका. पण, ऋजर यात कोणी असेल तर आकाश पातळ एक करु, ऋमुडदाही खोदून काढू, अशा शब्दात फडणवीसांनी भूमिका मांडली. तुम्ही तरुण आहात, तुमच्या भावना समजू शकतो मात्र अजित दादांच्या अपघाती निधनाबद्दल इतरांच्या भावनाही तेवढ्याच आहेत, असेही फडणवीसांनी सांगितले.

**नमो शेतकरी महासन्मान निधी योजना**

# राज्यातील ८९ लाखापेक्षा अधिक शेतकऱ्यांच्या खात्यावर १७९८.७८ कोटी रुपयांचे वितरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेत आठव्या हप्त्यापोटी एकूण ८९,७५,२९८ शेतकरी कुटुंबाच्या खात्यावर एकूण १७९८.७८ कोटी रुपये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते थेट लाभ हस्तांतरण द्वारे वितरित करण्यात आले.

विधान भवन, मुंबई येथे 'नमो शेतकरी महासन्मान निधी' योजनेचा आठवा हप्ता वितरण समारंभ झाला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेअंतर्गत आठव्या हप्त्यात जिल्हानिहाय रक्कम वितरित करण्यात आली असून, अहिल्यानगर ₹१०८.३० कोटी, अकोला ₹३६.७६ कोटी, अमरावती ₹५३.३४ कोटी, बीड ₹७२.७० कोटी, भंडारा ₹४१.६५ कोटी, बुलढाणा ₹६६.७४ कोटी, चंद्रपूर ₹४७.९५ कोटी, छत्रपती संभाजीनगर ₹६८.१८ कोटी, धाराशिव ₹४६.८५ कोटी, धुळे ₹३०.६३ कोटी, गडचिरोली ₹२८.५० कोटी, गोंदिया ₹४२.४५ कोटी, हिंगोली ₹३५.०० कोटी, जळगाव ₹७७.४० कोटी, जालना ₹५८.८२ कोटी, कोल्हापूर ₹९२.३३ कोटी, लातूर ₹५३.८७ कोटी, नागपूर ₹३३.८८ कोटी, नांदेड ₹७६.५० कोटी, नंदुरबार ₹२०.४७ कोटी, नाशिक ₹८३.८६ कोटी, पालघर ₹१९.९५ कोटी, परभणी ₹४९.७९ कोटी, पुणे ₹८५.२४ कोटी, रायगड ₹२२.७९ कोटी, रत्नागिरी ₹ ३१.२१ कोटी, सांगली ₹७५.४९ कोटी, सा-तारा ₹८७.०७ कोटी, सिंधुदुर्ग ₹२३.५३ कोटी, सोलापूर ₹९७.५२ कोटी, ठाणे ₹१४.१८ कोटी, वर्धा ₹२५.६० कोटी, वाशिम ₹३३.०५ कोटी आणि यवतमाळला ₹५७.१८ कोटी इतकी रक्कम वितरित करण्यात आली आहे.



'नमो शेतकरी महासन्मान निधी' योजनेंतर्गत २४ मार्च २०२६ अखेर एक ते सात हप्त्यांमध्ये एकूण १३०१७.३० कोटी रुपये ९३.०८ लाख शेतकरी कुटुंबाच्या खात्यावर थेट लाभ हस्तांतरण द्वारे जमा करण्यात आले आहेत.

# राज्यात इंधनसाठा मुबलक; पेट्रोल, डिझेल व एलपीजी पुरवठा सुरळीत

मुंबई : राज्यातील इंधनपुरवठ्याबाबत कोणतीही टंचाई नसून पेट्रोल, डिझेल आणि एलप-ीजीचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. सार्वजनिक क्षेत्रा-तील तेल विपणन कंपन्या - हिंदुस्तान पेट्रोलियम (एचपीसीएल), भारत पेट्रोलियम (बीपीसीएल) आणि इंडियन ऑइल (आयओसीएल) - यांच्या माध्यमातून राज्यभर इंधनाचे वितरण नियमित आणि सुरळीतपणे सुरू असल्याची माहिती अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.तेल विपणन कंपन्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार, २५ मार्च २०२६ रोजी राज्यातील इंधनसाठ्याची स्थिती समाधानकारक असून, पेट्रोलचा साठा २,०५,२३२ किलोलीटर, डिझेलचा साठा ४,६७,६०३ किलोलीटर तर एलपीजीचा साठा ३०,७६७ मेट्रिक टन इतका उपलब्ध आहे. हा साठा राज्याच्या गरजा पूर्ण करण्यास पुरेसा आहे.

तेल रिफायनरींकडून एलपीजीच्या दैनिक उत्प-ादनात वाढ करण्यात आली असून सर्व उत्पादक कंपन्या पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. त्यामुळे तेल विपणन कंपन्यांना नियमितपणे पेट्रोलियम पदार्थांचा पुरवठा होत आहे आणि पुरवठा साखळीमध्ये कोणताही अडथळा निर्माण झालेला नाही.

राज्यामध्ये पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा व नियमित साठा उपलब्ध असून कोणत्याही प्रकारची टंचाई निर्माण झालेली नाही. इंधन वितरण यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत असून संबंधित विभागांकडून सातत्याने देखरेख ठेवली जात आहे. याशिवाय, खासगी क्षेत्रातील कंपन्यांकडे देखील पेट्रोलियम पदार्थांचा साठा उपलब्ध असल्याने एकूण पुरवठा अधिक सक्षम झाला आहे. नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या अफवा, सोशल मीडियावरील अप्रमाणित संदेश किंवा चुकीच्या माहितीवर विश्वास ठेवू नये. भीतीपोटी इंधनाचा साठा करण्याचा प्रयत्न करू नये किंवा एकाच वेळी मोठ्या प्रमाणात पेट्रोल किंवा डिझेल खरेदी करू नये. पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी टाळावी, ज्यामुळे वाहतूक कोंडी किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही.

तसेच, इंधनपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासन व संबंधित कंपन्यांकडून सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात येत असून यावर नागरिकांनी विश्वास ठेवावा. कोणतीही शंका किंवा माहिती जाणून घेण्यासाठी केवळ अधिकृत शासकीय माध्यमांवरच अवलंबून राहण्याचे आवाहन अन्न नागरी पुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे.

## संपादकीय....

# अफवांना टाळा

राज्यातील इंधनपुरवठ्याबाबत कोणतीही टंचाई नसून पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्या - हिंदुस्तान पेट्रोलियम (एचपीसीएल), भारत पेट्रोलियम (बीपीसीएल) आणि इंडियन ऑइल (आयओसीएल) - यांच्या माध्यमातून राज्यभर इंधनाचे वितरण नियमित आणि सुरळीतपणे सुरू असल्याची माहिती अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.तेल विपणन कंपन्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार, २५ मार्च २०२६ रोजी राज्यातील इंधनसाठ्याची स्थिती समाधानकारक असून, पेट्रोलचा साठा २,०५,२३२ किलोलीटर, डिझेलचा साठा ४,६७,६०३ किलोलीटर तर एलपीजीचा साठा ३०,७६७ मेट्रिक टन इतका उपलब्ध आहे. हा साठा राज्याच्या गरजा पूर्ण करण्यास पुरेसा आहे. तेल रिफायनरींकडून एलपीजीच्या दैनिक उत्पादनात वाढ करण्यात आली असून सर्व उत्पादक कंपन्या पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. त्यामुळे तेल विपणन कंपन्यांना नियमितपणे पेट्रोलियम पदार्थांचा पुरवठा होत आहे आणि पुरवठा साखळीमध्ये कोणताही अडथळा निर्माण झालेला नाही. राज्यामध्ये पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा व नियमित साठा उपलब्ध असून कोणत्याही प्रकारची टंचाई निर्माण झालेली नाही. इंधन वितरण यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत असून संबंधित विभागांकडून सातत्याने देखरेख ठेवली जात आहे. याशिवाय, खासगी क्षेत्रातील कंपन्यांकडे देखील पेट्रोलियम पदार्थांचा साठा उपलब्ध असल्याने एकूण पुरवठा अधिक सक्षम झाला आहे. नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या अफवा, सोशल मीडियावरील अप्रमाणित संदेश किंवा चुकीच्या माहितीवर विश्वास ठेवू नये. भीतीपोटी इंधनाचा साठा करण्याचा प्रयत्न करू नये किंवा एकाच वेळी मोठ्या प्रमाणात पेट्रोल किंवा डिझेल खरेदी करू नये. पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी टाळावी, ज्यामुळे वाहतूक कोंडी किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही. तसेच, इंधनपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासन व संबंधित कंपन्यांकडून सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात येत असून यावर नागरिकांनी विश्वास ठेवावा. कोणतीही शंका किंवा माहिती जाणून घेण्यासाठी केवळ अधिकृत शासकीय माध्यमांवरच अवलंबून राहण्याचे आवाहन अन्न नागरी पुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे.

# चैत्र यात्रा; पंढरपूर शहरात मांस, मटण विक्रीस मनाई


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : चैत्र शुध्द एकादशी २९ मार्च २०२६ रोजी असून, यात्रा कालावधी दि. २३ मार्च ते ०२ एप्रिल आहे. या यात्रा कालावधीत शहरात श्री विठ्ठल- रुक्मिणी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. शहरातील सार्वजनीक शांततेसाठी व कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी दिनांक २८ ते ३० मार्च २०२६ या कालावधीत मांस, मटण, मासे विक्री व प्राणी कत्तल तसेच मांसजन्य पदार्थ विक्री करणे यावर बंदी घालण्यात आल्याचे आदेश उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी निर्गमित केले आहेत.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन उपविभागीय दंडाधिकारी श्री.इथापे यांनी पंढरपूर शहरातील मांस, मटण, मासे विक्री व प्राणी कत्तल तसेच मांसजन्य पदार्थ विक्री करणे यावर बंदी घालण्यात आली आहे.

# कर्मवीर महाविद्यालयाच्या दोन खेळाडूंची राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयातील दोन विद्यार्थिनींची आंतर विद्यापीठ राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा पंजाब येथील लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी येथे आयोजित करण्यात येणार आहे.

महाविद्यालयातील कु. चंद्रिका बाबर (बी.एस्सी. भाग ३) आणि कु. निर्जला माळी (बी. एस्सी. भाग ३) या विद्यार्थिनींनी आंतर महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर त्यांची आंतर विद्यापीठ राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

या निवडीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी दोनही विद्यार्थिनींचा सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले व राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक प्रा. अनिल परमार, प्रा. विठ्ठल फुले व मनोज प्रा. मनोज खपाले उपस्थित होते.

या यशाबद्दल महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व सेवक वर्गाने विद्यार्थिनींचे अभिनंदन करत पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# नीतीवंत, पुण्यवंत, वरदवंत श्री. देवेंद्र फडणवीस

**महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री माननिय देवेंदजी फडणवीस यांचे मुख्य सचिव श्रीमान श्रीकर परदेसी यांनी फडणवीस यांचा एक वेगळाच परिचय करून दिलेला वाचनीय (प्रदीर्घ) लेख**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुख्यमंत्री म्हणून शपथविधी झाल्यानंतरची गेली अडीच वर्षे मी त्यांचा प्रधान सचिव म्हणून काम पाहात आहे. परंतु त्यांच्याशी असलेला प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष ऋणानुबंध मात्र अडीच वर्षांहून किती तरी जुना, म्हणजे जवळपास पंचवीस वर्षांचा आहे ..!!

मसुरीच्या प्रशिक्षणात प्रत्येक प्रशिक्षणार्थीला एक ज्येष्ठ आय.ए.एस.अधिकारी काउन्सेलर म्हणून देण्यात येतात. ते सगळी यथासांग चर्चा करुन प्रशिक्षणार्थीच्या करियरची पुढील दिशा ठरवतात ..!!

मी सोलापूरचा आहे ..!! आय.आय.टी.तून केमिकल इंजिनियर झालो, प्रशासकीय सेवेच्या माध्यमातून हातून काहीतरी चांगलं काम घडावं अशी माझी मनीषा आहे ..!! उच्च शिक्षणासाठी अनेक उत्तम अमेरिकी विद्यापीठातील शिष्यवृत्ती मला मिळाल्या होत्या ..!! त्या निमित्ताने मी बरेच भ्रमण करु शकलो असलो तरी, मी तुळजापूरच्या पूर्वेला मात्र कधीही गेलो नाही ..!!

माझे हे वाक्य ऐकताच ते काउन्सेलर म्हणाले ..

उत्तम, मग तुला चंद्रपूरला पाठवू .!!

चंद्रपूरला पोचलो तर चंद्रपुरातच काय पण आख्ख्या विदर्भात (नंतर माझी पत्नी झालेल्या मनीषाचा अपवाद वगळता ..) माझा एकाही व्यक्तीशी परिचय नव्हता ..!! आय.ए.एस. प्रशिक्षणार्थीला वेळ भरपूर, निश्चित असं काम नाही, त्यामुळे भटकायची अमर्याद मुभा असते ..!! श्री. देवेंद्र फडणवीस (ज्यांना आम्ही सर्व अधिकारी वर्ग सर म्हणतोआणि बाकी तमाम दुनिया 'भाऊ' म्हणते ..!! हे काम कराच लागते हां, भौ ..!! असे पाच-सातशे तरी डचड त्यांच्या मोबाईलवर रोज दणादण आदळत असतात ..!!)

ह्यांच्या काकू शोभाताई तेव्हा आमदार होत्या. भा.ज.प. हा त्याकाळी फार हवा-हवासा फॅशनेबल पक्ष नव्हता. ह्या पक्षाचे मर्यादित लोक-प्रतिनिधी होते. सुमतीबाई सुकळीकर अनेक प्रयत्नांनंतरही शहरी नागपुरातून कधी निवडून येऊ शकल्या नव्हत्या. समितीच्या माध्यमातून मनीषाच्या आजीशी त्यांची खूपच सलगी होती आणि त्यांच्या निवडणुकीच्या रणनितीविषयी उत्साही चर्चा घडायच्या .. !! तगडी राजकीय मिरासदारी, वारसा नसलेल्या बाळबोध मध्यमवर्गीय घरातील गृहिणी आमदार म्हणून शोभाताईभोवती एक वलय होते. फटफटीवरुन किंवा १५-२० कार्यकर्ते कोंबलेल्या उघड्या कमांडर जीपमधून त्या चंद्रपूरच्या ४५ डिग्री उन्हात फिरत असत ..!!

मूल येथील त्यांचे घर, शेती पाहायचा योग तेव्हा आला. सरांचा, त्यांच्या कुटुंबाचा शेतीशी काही संबंध नाही असा जो बोभाटा सध्या सर्रास केला जातो तो ऐकून मला आश्चर्य वाटतं. तोपर्यंत, हुरडा खायला शेतावर जाण्याइतकाच शेतीशी संबंध असलेल्या मला, कास्तकारी, कास्तकारीचं अर्थशास्त्र, बारकावे समजून घ्यायची पहिली संधी तेव्हा मिळाली ..!! ही त्या ऋणानुबंधाची अप्रत्यक्षच सुरुवात ..!!

त्यानंतर अमरावती, वर्धा ह्या नागपूरच्या जवळपासच्या जिल्ह्यांत माझी नेमणूक झाली. सरांची राजकीय कारकीर्द आता कुठे सुरु झाली होती. वयाच्या विशीतच ते नागपूरचे महापौर झाले ..!! तेव्हा मी आणि मनीषा त्यांना भेटायला गेलो आणि म्हणालो ..

वयाच्या विशीतच आपण महापौर झाला आहात ..!! वयाच्या चाळिशीत मुख्यमंत्री नक्की होणार ..!!

तेव्हा त्यांनी किंचित स्मितहास्य केले. (ते मुख्यमंत्री झाल्यावर भेटायला गेलो आणि तशाच अर्थाचं काही म्हणालो तेव्हाही, त्यांनी पुन्हा तसेच स्मितहास्य केले ..!!) सरांचे 'ट्रेडमार्क स्मित-हास्य' हा त्यांच्या लोभस व्यक्तिमत्वाचा खास पैलू ..!!

'मुद्दा पटला, मुद्दा पटला नाही, मुद्दा ठीक वाटतोय , पण पुढे त्याचं काय करायचं ..?? मुद्दा अगदीच किरकोळ आणि त्याज्य आहे पण तुमचा मान राखायचा म्हणून ऐकतोय ..!!'

असे असंख्य अर्थ त्या क्यूट स्मित हास्यातून निघू शकतात. नृपस्य चित्तं, पुरुषस्य भाग्यम् ..!! असा एक श्लोक आहे. म्हणजे राजाच्या मनात आणि पुरुषाच्या भाग्यात काय आहे हे ब्रह्मदेवालाही समजणार नाही. एका कॉलेजच्या स्नेह-संमेलनात असा विषय निघाला की, श्री. देवेंद्र फडणवीस मुलांना का आवडतात ? ते अत्यंत कर्तबगार आहेत, प्रामाणिक आहेत, अभ्यासू आहेत, प्रचंड हुशार आहेत अशी बरीच उत्तरे झाल्यावर एक मुलगी उत्स्फूर्तपणे म्हणाली बिकॉज ही इज सो क्यूट ! सरांच्या चेह-यावरचे निरागस भाव हा त्यांच्या क्यूट स्मितहास्या इतकाच त्यांचा खास विशेष. माणसाला असंख्य सोंगं वठवता येतील, नाटकं करता येतील परंतु अखंड निरागसतेचं नाटक करणं अशक्य असतं. ज्याप्रमाणे मन चिंतामुक्त नसेल तर अगदी सर्वसुखांनी लगडलेल्या प्रासादातही माणसाला शांत झोप लागू शकत नाहीा त्याचप्रमाणे जर मन वैर-विद्वेष भावनेपासून पूर्ण मुक्त नसेल तर चेहरा निरागस राहू शकत नाही. सरांना ज्यांनी पूर्वायुष्यात मदत केली आहे, जे त्यांचे मित्र आहेत त्यांच्यासाठी सर नेहमीच धावून जातात हे तर ठीकच, स्वाभाविकच. पण जी लोकं अगोदरच्या काळात त्यांचेशी वाईट वागली आहेत, नाहक त्रास दिला आहे असाही कुणी जर अडचणीत असेल, त्याचे काही काम असेल तर सर लगेच ते करतील. इतक्या सरळ माणसाचा चेहरा नेहमी निरागस दिसणारच की ..!!



विदर्भात जिल्हाधिकारी म्हणून काम करत असलो तरी सरांच्या भेटी फार व्हायच्या नाहीत. पण माझी सासुरवाडी नागपूरला आणि सर राहतात त्याच धरमपेठ भागात ..!! शिवाय मनीषा आणि सर एकाच शाळेत, कॉलेजात होते. त्यामुळे समान मित्र, स्नेह्यांची रेलचेल होती. त्यांच्या बहरत चाललेल्या राजकीय घोडदौडीविषयी, त्यांचे वडील कै. गंगाधरराव फडणवीस ह्यांच्या अफाट लोक-संग्रहाविषयी, खूपदा चर्चा व्हायची. गंगाधरराव आणिबाणीत तुरुंगात होते तेव्हां देवेंद्रनी बाणेदारपणे सांगितलं की अशा स्थितीत मी 'इंदिरा' कॉन्व्हेंट हया नावाच्या शाळेत जाणार नाही. वयाच्या सहाव्या वर्षी किती मुलांना इतकी जाण, इतकं धैर्य, इतका निश्चय असतो ..??

देवेंद्र फडणवीस हा माणूस खूप पुढे जायला हवा, अशी कळकळीची भावना, जी राजकारण्यांबद्दल अपवादानेच आढळते, सगळ्यांच्याच मनात असे. स्थानिक नगरसेवक, नंतर आमदार तेच असल्याने, आजूबाजूच्या परिसरात झपाट्याने चांगला बदल होत होता. नुकतंच लग्न झालं तेव्हा नव्या जावयासकट घरातील सर्वांना अंगणातल्या नळातून बादल्यांतून पाणी भरावं लागे. सरांच्या प्रयत्नामुळे 24 X 7 पाणी येऊ लागलं. समोरचं मैदान त्यांनी नेटकं तयार केलं, त्यामुळे मनसोक्त क्रिकेट खेळता यायचं, असे व्यक्तिगत फायदे होत होते. वेस्ट हायकोर्ट रोडवरील इंडियन कॉफी हाऊस, रेड्डी मेस अशा खवय्येप्रिय गप्पा अड्ड्यांवर सरांचं दर्शन हमखास व्हायचं. सामोसा खाऊन तो कुठला आहे हे त्यांना बिनचूक ओळखता यायचं. नागपूरच्या अजित बेकरीचा ओव्हनकेकच नव्हे तर जगभरात कोणता खाद्यपदार्थ कुठे, कसा असतो ह्या विषयी अगाध ज्ञान त्यांना आहे आणि तरीही आईच्या हातचं खाणं ही अत्युच्च पसंद, मग ती साधी फोडणीची पोळी का असेना ! साहजिकच आई देखील खूप अभिमानाने नेहमीच आवर्जून सांगतात, आधी प्रश्न विचारतो, कोणी बनवलंय महाराजने की तू ? आणि मी बनवलेलं असेल तरच खातो. (आई हा विषय निघाला म्हणून एक भटकणं अपरिहार्य आणि क्षम्य आहे. एरवी फारसे धार्मिक आणि सश्रध्द न वाटणारे सर,शिवाजी हा विषय निघाला की, मात्र' भक्त ' हया वर्गात जाऊन बसतात. शिवाजी,जिजाऊ, संभाजी बद्दल ते बोलायला लागले की, वेळ काळ मोजमापाची काही मर्यादा राहात नाही. ) जगण्यासाठी खावं, खाण्यासाठी जगू नये अशी शिष्टसंमत उक्तीअसतांना, मी मात्र खाण्यासाठी जगतो असं सर बिनधास्त म्हणतात ..!! पण त्याचवेळी, सरांनी नुकतंच तीस किलो वजन घटवलं हे विशेष ..!!

एकदा का एखादी गोष्ट मनावर घेतली की ती करायचीच, हे त्यांच्या उत्तुंग यशामागचं महत्वाचं सूत्र आहे ..!!

सरांचे काका अण्णासाहेब फडणवीस हे अत्यंत सत्प्रवृत्त आणि कार्यक्षम असे प्रशासकीय अधिकारी होते. माझ्या सासरेबुवांचे ते काही वर्षे वरिष्ठ सहकारी असल्यानें, त्यांच्या कुटुंबाचाही उत्तम परिचय होता. ते बुलढाण्याला जिल्हाधिकारी असतांना, तेव्हाचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाणांनी त्यांना एकदा विचारलं .

का हो, कलेक्टरसाहेब, ते तुरुंगात फडणवीस आहेत ते तुमचे कोण ..??

तो माझा सख्खा बंधु ..

-अण्णासाहेब ..!! ओह ..!! मग तुमचे संबंध आहेत कां त्यांचेशी अजून ..??

-शंकरराव प्रश्नच नाही. पुर्वीप्रमाणेच उत्तम संबंध तर आहेतच, पण तितकेच नव्हे तर एका ध्येयापोटी ते हा तुरुंगवास भोगत आहेत ह्या गोष्टीचा अभिमान आहे ..!!

-अण्णासाहेब ..

मुख्यमंत्र्यांना इतकं स्पष्टपणे बोलण्याची छाती खूप कमी अधिका-यांमध्ये असते. तो तर आणिबाणीचा कठीण काळ होता ..!! त्या काळात असं बोलण्याची हिंमत .. तेही कसलाच कटुपणा उद्भवू न देता दाखवणं, हे विशेषच ..!! श्री. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले तेव्हा आणि त्यानंतरच्या काळात, अनेकजण अधूनमधून चुकचुकायचे ..!! अजूनही चुकचुकतात की, श्री.देवेंद्र फडणवीस हे आहेत उत्तमच पण तरुण आहेत (म्हणजे ज्युनियर आहेत, असे वाचायचे ..!!) त्यांच्यापेक्षाही जेष्ठ, अनुभवी मंडळी आहेत की ..

असा तो सूर असतो ..!! त्यावर मला असं वाटतं की, वर मी उल्लेख केलेल्या सर्व पूर्वसुरींची, त्यांनी घेतलेल्या परिश्रमांची, खालेल्लूया खस्तांची पुण्याई श्री. देवेंद्र फडणवीस हयांच्यामागे भक्कमपणे उभी आहे ..!! त्यांची निस्सीम सेवेची, अनुभवाची, ज्येष्ठतेची पुण्य-शिदोरी सरांसोबत आहे ..!! आणि अशीही मौलिक शिदोरी बरोबर असायला माणूस सरांसारखा सुसंस्कृत, वडिलधा-या मंडळींचा मान राखणारा, त्यांच्या विषयी आदर असणारा असा आज्ञाधारक पुत्र, पुतण्या, भाचा असावा लागतो ..!! म्हणून लेखाच्या शीर्षकात 'पुण्यवंत' हा शब्द मी जाणीवपूर्वक वापरला आहे ..!!

त्याच काळात त्यांच्या पत्नी अमृताजी स्थानिक क्सिस बँकेत होत्या. त्या स्कूटी घेऊन येत आणि बँकेची अमुक एखादी डिपॉझिट योजना घ्याच असं माझ्या सासूबाईंना पटवून देत ..!! मुरलेल्या LIC एजंटला शोभेल अशा चिकाटीने चाललेला तो संवाद शांतपणे ऐकताना मला मोठी गंमत वाटायची. एखाद्या व्यक्तीच्या सतत भेटीगाठी होत नसतानाही, असंख्य अदृश्य धाग्यांनी त्या व्यक्तीचा संबंध येत राहतो, हा अनुभव मला सरांच्या बाबतीत आला ..!! ह्यालाच मराठीत 'ऋणानुबंध' हा शब्द असावा. (समृध्द इंग्रजी भाषेत 'ऋणानुबंध' ला चपखल प्रति-शब्द मला सापडत नाही ..) वीस वर्षानंतर मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस ह्यांचा प्रधान सचिव म्हणून काम करण्याचे भाग्य माझ्या वाट्याला येईल हे त्या काळी माझ्या स्वप्नातही आलं नसतं ..!! Knowledge is Power हे तंतोतंत खरं आहे तरी सध्याच्या गुगलच्या काळात, सगळंच ज्ञान प्रत्येकाला चुटकीसरशी उपलब्ध आहे म्हण्टल्यावर, प्रत्येकच जण पॉवरफुल होतो का ..?? ह्या प्रश्नाचं उत्तर मला सरांबरोबर काम करताना मिळालं ..!! महाराष्ट्रातील काना-कोपऱ्यातली एखादी गोष्ट असो किंवा हवामानशास्त्र, अद्ययावत तंत्रज्ञान, संगीत, एखाद्या अधिकाऱ्याचे, मंत्र्याच्या खाजगी सचिवाचे कोणकोणते 'उद्योग'चालू आहेत ..??, चित्रपट, विमानं, GST, शेती अशा असंख्य विषयांची बित्त-बातमी त्यांच्याकडे असते ..!!

त्यांच्या बरोबर काम करणाऱ्यांना भेडसावणारी एक अडचण म्हणजे, त्यांना काही सांगायला जावं, तर ते त्यांना अगोदरच ठाऊक असतं, मग भले ती घटना पाच-दहा मिनिटांपूर्वी घडलेली का असेना ..!! आणि हेच त्यांच्या थक्क करणा-या निर्णयक्षमतेचं रहस्य आहे. सरकारमध्ये प्रत्येक निर्णय हा कागदावर, फाईलवरच शिक्कामोर्तब होतो. हे काम चालू असतांना कधीही ते नंतर बघू किंवा चर्चा करा असे ते म्हणत नाहीत. तासाभराच्या अवधीत शेकड्याहून अधिक गुंतागुंतीच्या विषयांवर अचूक निर्णय ते घेवू शकतात कारण, तो विषय विविध मार्गांनी त्यांना अगोदरच माहीत झालेला असतो. सकाळी ९ ते रात्री ३ ह्या त्यांच्या दिवसात अनेक बैठका, विविध व्यक्तींशी प्रत्यक्ष भेटी, फोन, डचड अशा माध्यमांतून ही माहिती गोळा होते. रोज त्यांना हजार तरी डचड नक्कीच येत असावेत आणि कितीही छोटा माणूस असो, प्रत्येकाला उत्तर जातंच. बहुदा ते रात्री २ किंवा ३ वाजता जातं. मग तो माणूस किती सुखावत असेल ..!!

खुद्द मुख्यमंत्री माझ्या कामाची तत्परतेने दखल घेत आहेत ..!! हे Perception फार मोलाचं असतं. उत्तरदायी सरकार म्हणजे ह्याहून अधिक काय ..?? अर्थातच नंतर आमच्या यंत्रणेकडून त्या कामाचा तडफेने पाठपुरावा होतो. माणूस लहान-मोठा, गरीब-श्रीमंत, प्रांत-जात-भाषा-धर्म असा कसलाच भेदभाव सरांच्या विचार विश्वात नसतो. 'हा आपला तो तुपला ..' अशी कसलीच जाणीव नसते, फक्त तो माणूस सच्चा हवा ..!! सरांचा मेंदू हा बुध्दिमत्ता संशोधकांकरता प्रयोगशाळा म्हणून वापरला जाऊ शकतो ..!! स्वामी विवेकानंदांबद्दल सांगतात की, एखाद्या जाडजूड ग्रंथाची पाने उलटून ते पंधरा वीस मिनिटांत ग्रंथ पालथा घालायचे. एकदा कुणी तरी शंका उपस्थित केली की असा कसा वाचून संपला लगेच ..?? तेव्हा ते शंकेखोराला म्हणाले ..

✻ विचार, जे विचारायचंय ते ..!!

आणि जे विचारलं ते त्यांनी शब्दश: उद्धृत करुन दाखवलं. तसंच सर जेव्हा एखादा कागदांचा गठ्ठा पाहतात तेव्हा अगदी कॅज्युअल पध्दतीने ..!! मलाही प्रश्न पडतो की नेमकं काय वाचलं त्यांनी ..?? कधी वाटतं की पुन्हा एकदा सविस्तर सांगावं कां ..?? पण त्या संबंधीचा मंत्री/आमदार इ. नंतर येऊन सांगतो की, साहेबांना खडान् खडा माहीत होतं ते प्रकरण आणि व्यवस्थित समजावून दिलं मला ..!! त्यांचं माहिती घेणं, ती साठवणं, फोलपटं फेकून देणं, मौलिक माहितीवर प्रक्रिया करणं आणि नंतर त्या माहितीचा सामर्थ्यशाली वापर करणं, हे कसब एखाद्या सुपर कॉम्प्युटरला लाजवेल असं आहे ..!!

'वक्ता दशसहस्त्रेशु' हे वचन श्री. देवेंद्र फडणवीस यांनी साफ खोटं ठरवलं. कारण ते दहा हजारांत नव्हे तर दहा कोटींत एक असे वक्ते आहेत ..!! सचिन तेंडुलकरला पाहावं तर लीलया शतक झळकावताना, अमिताभ बच्चनला पाहावं तर अँग्री यंग मॅन म्हणून, तसं सरांना पाहावं तर भाषण करताना ..!! भाषणाचा विषय, प्रभावी मुद्दे, भरगच्च तपशील, विरोधकांना गुगल्या, त्यांच्या फुलटॉसवर निर्दय षटकार, कधीकधी मजेत टोप्या उडवणे अशा असंख्य पैलूंसकट सरांनी वक्तृत्व ही कला न ठेवता तिला शास्त्र, विद्या, कसब, कला हयांच्या एका वेगळयाच पातळीवर नेऊन ठेवलं आहे. एरवी कोणत्याही व्यक्तीला सहजप्राप्य असणा-या सरांना, महत्वाच्या भाषणाच्या आधी व नंतर मात्र व्यत्यय चालत नाही. अनेकदा आम्ही त्यांना सरकारी माहिती,धोरणे, आकडेवारी असा कच्चा माल उपलब्ध करुन देतो. पण कॅन्व्हास, रंगांची डब्बी, कुंचला आणि उदा. 'मोनालिसा' सारखे जग-प्रसिध्द पेंटिंग हयांचा जितका संबंध असतो तितकाच त्या शासकीय टिपण्या आणि सरांच्या भाषणाचा असतो. एखाद्या कसबी कारागिराने भरजरी पोताची पैठणी विणावी तसे सरांचे भाषण विणले जाते. कधी मंद, शांत सूर तर क्षणार्धात घणाघाती आक्रमक सूर पकडत, सर आपल्या भाषणात विषयाची पूर्ण उकल करतात. विधी मंडळातील भाषण असेल तर, अगोदर उपस्थित झालेल्या मुद्यांचा एक एक करत परामर्श घेऊन नंतर असा काही भन्नाट चकवा मुद्दा मांडतात की समोरचे दिग्मूढ होऊन जातात ..!! प्रभावी बोलण्यामुळे हा माणूस आम्हाला काहीही पटवून देऊ शकतो आणि काही प्रतिवादही करता येत नाही असा हतबल भाव समोरच्यांच्या चेह-यावर हमखास असतो ..!!

मराठी नेत्यांना कायम त्रस्त करत आलेली समस्या म्हणजे, मराठी व्यतिरिक्त हिंदी, इंग्रजी या भाषांत बोलता न येणे. ह्या एका कारणामुळे अनेक कर्तबगार मराठी नेते दिल्लीत किंवा राष्ट्रीय स्तरावर छाप पाडू शकले नाहीत, असे काही जाणकारांचे मत आहे. सरांचे मात्र मराठी, हिंदी, इंग्रजी या तिन्ही भाषांवर कमालीचे प्रभुत्व आहे आणि अतिशय सफाईने ते ह्या तीनही भाषांतून संवाद, वक्तृत्व साधू शकतात. अभी यहाँ पांडे जी ने जो विचार मांडे है किंवा मागण्या मान्य करो नहीं तो आंदोलन का भडका उड जायेगा अशा हिंदीला उदारपणे माफ करण्याची सवय झालेल्या महाराष्ट्राला सरांचं हिंदी म्हणजे एक मेजवानीच असते ..!! अटलजींच्या हिंदीशी बरोबरी करु शकेल अशा त्यांच्या वक्तृत्वामागे, ते नागपूरचे आहेत (आणि पुणे, नाशिक, सांगली, सोलापूरचे नाहीत ..) ह्याचा वाटा आहेच पण त्यांनी ते परिश्रमपूर्वक कमावलेले आहे हेही तितकंच खरं ..!!

कॉलेज जीवनात ते एक पट्टीचे वाद-विवादपटू होते. देशभरातल्या अनेक आंदोलनांमध्ये त्यांनी भाग घेतलेला आहे आणि हया सहभागामुळे त्यांचे वाक्पटुत्व कसदार बनले आहे. गंमत म्हणजे, सर्वसामान्यांना महाबळेश्वर, उटी, गोवा, शिमला ही ठिकाणं पर्यटनामुळे माहीत असतात. पण सर नेमके अशा ठिकाणी फारच क्वचित गेलेले असतात. कारण त्यांची उमेदवारीच्या काळातील सगळी फिरती आंदोलनांच्या ठिकाणीच झालेली आहे. अमेरिकेत गुगल, फेसबुकच्या सीईओंशी ज्या सहजपणे आज ते इंग्रजी बोलतात त्याच सहजपणे, ते विदर्भातल्या छोटया कास्तकाराशी खास व-हाडी शैलीत बोलू शकतात ..!! ऐन मंत्रीमंडळ बैठकीतही, मी तुम्हाला पुन्हा असं सांगून राहिलो की.. असं म्हणून ते आपलं वैदर्भीय असणं छान मिरवतात. देहबोली, भाषा, स्वभावाचा पुरेपूर वापर करणारे समर्थ संवाद-नैपुण्य हा त्यांच्या यशामागचा महत्वाचा आधारस्तंभ आहे. सत्तावन्न वर्षांच्या महाराष्ट्राचे नेतृत्व बव्हंशी ग्रामीण महाराष्ट्रातून उभारले. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, सहकार, शेती ह्यात मुरलेले असे हे नेतृत्व होते. त्यामुळे एका बाजूला हे विषय, आणि दुस-या बाजूला माहिती तंत्रज्ञान, नागरीकरण, मेट्रो, सोशल मिडिया हे एकविसाव्या शतकातले विषय ही दरी कायमच राहिली ..!!

कृषी, सिंचन, सहकार हे ग्रामीण महाराष्ट्राशी संलग्न विषय आणि नागरी वाहतूक, आय.टी, 'मेक इन-महाराष्ट्र' असे उच्चभ्रू विषय हयांची सांगड घालणारे देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्रातले विरळाच नेतृत्व. एकीकडे जलयुक्त शिवार, बळीराजा चेतना अभियान ह्या सारख्या योजना त्यांच्या कल्पनेतून साकारल्या. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेतून न भूतो न भविष्यती अशी कर्ज-माफी झाली. त्याचवेळी दुसरीकडे नागपूर, मुंबई, पुणे येथील मेट्रो, नागपूर-मुंबई समृध्दी महामार्ग, मुंबईतला कोस्टल रोड, शिवडी ते न्हावाशेव्हा सागरी पूल, नवी मुंबई-पुणे विमानतळ, असे पायाभूत सुविधा प्रकल्प त्यांनी प्रगती पथावर नेले. नागरी भागात यशस्वी केलेल्या अनेक प्रकल्पांमुळे नगर परिषदा, महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये घवघवीत यश मिळाले ..!!

एक अभ्यासू, सु-स्वभावीनेता ते 'हुकूमी ब्रँड देवेंद्र फडणवीस' असा प्रवास निव्वळ अडीच वर्षांच्या कालावधीत घडला. कोणालाही अचंबा वाटावा असा हा प्रवास आहे. मोठया व्यक्तीच्या सतत आजूबाजूला राहाणा-यांना त्या व्यक्तीच्या थोरपणाची सवय होऊन जाते, त्या थोरपणाची महती फार वाटेनाशी होते अशा अर्थाची एक इंग्रजी म्हण आहे. पण मला सरांच्या बाबतीत ती पटत नाही. उलट जितकं त्यांच्या आजूबाजूला असावं तितकी त्यांच्या व्यक्तिमत्वाची संपन्नता जास्त जास्त खुलत जाते आणि एका लेखाच्या मर्यादेत ही संपन्नता व्यक्त करणं हे अशक्यप्रायच ..!! त्यासाठी बहुखंडी चरित्र-ग्रंथच लिहायला हवा आणि कधी तरी, योग्य वेळी माझ्या हातून हे काम व्हावं असं मला फार वाटतं ..!! एका दैदिप्यमान कारकिर्दीची पंचवीस वर्ष पूर्ण होतआहेत. अजून खूप मोठा प्रवास पुढे आहे. हया वाटचालीकरता अकरा कोटी महाराष्ट्रीयांच्या शुभेच्छा त्यांच्या सोबत आहेत. परमेश्वराचे उदंड आशीर्वाद त्यांच्यावर असावेत हीच प्रार्थना ..!!

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# भिवंडीत अक्षयपात्र किचनच्या माध्यमातून गॅस टंचाई काळात ही नियोजन पद्धतीने विद्यार्थ्यांना दिले जाते शास्त्रोक्त सकस स्वच्छ अन्न

## देशभरातील विविध शाळांमध्ये ५० लाख विद्यार्थ्यांना भोजन देण्याचा टप्पा केला पार




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : इस्कॉन अंतर्गत बंगलोर येथील अक्षयपात्र फाउंडेशन च्या माध्यमातून ना नफा ना तोटा या तत्वाने अक्षयपात्र किचन चालवले जाते. ज्या माध्यमा तून अनेक शाळांमधील विद्यार्थ्यांना मध्यान भोजन योजना चालविली जात आहे. देशभरात अक्षयपात्र किचनच्या माध्यमातून देशभरातील विविध शाळांमध्ये ५० लाख विद्यार्थ्यांना भोजन देण्याचा टप्पा नुकताच पार केला आहे.१७ मार्च रोजी त्याचा सोहळा देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थिती मध्ये साजरा केला.भिवंडी पालिका क्षेत्रातील १०४ प्राथमिक शाळांसह खाजगी अनुदानित शाळांमधील एकूण २१ हजार विद्यार्थ्यांना अक्षयपात्र किचन मधून दररोज शास्त्रोक्त पद्धतीने बनविलेले सकस स्वच्छ व पौष्टिक मध्यान भोजन देण्याचे काम २०२२ पासून सुरू केले आहे.विशेष म्हणजे हे मध्यान भोजन विद्यार्थ्यांच्या ताटात पोहचे पर्यंत अन्नाची पोषक तत्वे,सकसपणा उत्तम राहील याची काळजी अक्षयपात्र किचनच्या व्यवस्थापना कडून घेतली जाते .

भिवंडीत अक्षयपात्र किचनच्या माध्यमातून मध्यान भोजन योजना राबविताना शासनाच्या धोरणानुसार १२ मेनू ठरवून दिले आहेत.तर वेगवेगळ्या पद्धतीचे सहा पुलाव बनवून देतो तर अक्षयपात्र फाउंडेशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सुका पुलाव खाणे बेचव होऊ नये यासाठी करी बनवून दिली जाते. परीक्षा कालावधीत संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना डिसेंबर महिन्यापासून पौष्टिक खाद्यपदार्थ म्हणून शेंगदाणा राजगिरी चिक्की,व विविध फळे दिली जातात.तर इराण इस्त्राईल युद्धामुळे सर्वत्र गॅस टंचाई भासत असली तरी शासन व पालिका प्रशासन व भारत गॅस यांनी केंद्र सरकारच्या निर्देशानुसार किचनला गॅसची कमतरता भासू दिले नाही त्यामुळे नियोजन पद्धतीने विद्यार्थ्यांना जेवण देणे शक्य होत असल्याची माहिती या किचनचे ऑपरेशन हेड दत्तात्रय गाडे यांनी दिली.विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी ही मध्यान भोजन टाकून देऊ नये यासाठी प्रत्येक शाळेत मदतनीस यांची मदत घेऊन ते वितरण केले जाते.

विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या अन्नाच्या बाबतीत कोणतीही तडजोड केली जात नाही हे अक्षय पात्र किचनचे वैशिष्ट्य आहे.त्यासाठी येथे स्वच्छतेवर विशेष भर दिला जातो.येथे धान्य, डाळी, पालेभाज्या आल्यानंतर त्याची स्वच्छता, भांड्यांची स्वच्छता निर्जंतुनीकरण केले जाते.

दररोज तयार झालेल्या खाद्य पदार्थांचे नमुने तीन दिवस सुरक्षित ठेवलें जातात.तर शाळेत विद्यार्थ्यांच्या ताटात पुलाव जाई पर्यंत जेवण गरम रहावे यासाठी तापमान तपासले जाते.या किचनचे परीक्षण दर दोन महिन्याने केले जाते.

तर येथील सर्व धान्य मसाले पालेभाज्या फळभाज्या यांची तपासणी करून ते खाण्यास योग्य असल्या नंतरच वापरले जाते त्यासाठी या किचन मध्ये स्वतंत्र प्रयोगशाळा सुद्धा आहे अशी माहिती येथील खाद्य तपासणी प्रयोग शाळेच्या अंकिता कामनवर यांनी दिली आहे.शहरातील विविध भागातील शाळांना वेळेवर गरम मध्यान भोजन मिळावे यासाठी शहरात १५ रूट बनवण्यात आले आहेत. ज्या मध्ये आठ टेम्पो मधून हे खाद्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवले जाते.

आज पर्यंत हे काम नियमित सुरू असून वेळेवर मध्यान भोजन पोहचवण्यात अक्षयपात्र किचन यशस्वी झाले आहे.त्याबाबत कोणतीही तक्रार आलेली नाही अशी माहिती पराग गोणे यांनी दिली.

# डॉ. दयानंद वाघमारे यांना राष्ट्रीय रविदास परिषदेचा ‘समाजरत्न’ पुरस्काराने सन्मानित



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सुधाकर रणदिवे/धाराशिव (प्रतिनिधी) : राष्ट्रीय रविदास परिषद, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा ‘समाजरत्न’ पुरस्कार यंदा डॉ. दयानंद वाघमारे यांना प्रदान करण्यात आला आहे.

क्रांतिकारी संत गुरु रविदास तसेच मान्यवर कांशीरामजी यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त लातूर येथे आयोजित कार्यक्रमात मराठवाड्यातील विविध मान्यवरांचा समाजरत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. याच कार्यक्रमात डॉ. दयानंद वाघमारे यांनाही गौरविण्यात आले.

या प्रसंगी राष्ट्रीय रविदास परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. अशोकराव अगावणे, राष्ट्रीय चर्मकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी आमदार बाबुरावजी माने, अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे संस्थापक मा. चंद्रप्रकाश देगलूरकर, राष्ट्रीय रविदास परिषदेचे राज्य प्रवक्ते बालाजी साबळे, लातूर जिल्हाध्यक्ष खंडेराव बनसोडे, राजेश खाडे तसेच प्राचार्य आर. डी. निटूरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. दयानंद वाघमारे यांना ग्रामीण भागातील शेती व सामाजिक विकास, महिला सक्षमीकरण तसेच शैक्षणिक क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.सदरील पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ.दयानंद वाघमारे यांचे अभिनंदन होत आहे.

# निफाडला ईद निमित्त शिरखुर्मा पार्टी

**प्रेम आणि एकतेचा संदेश देणारा उपक्रम उत्साहात संपन्न**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : जातीपातीच्या भिंती पाडून सर्वधर्मसमभावाचे दर्शन घडवत एकतेचा गोड संदेश देणारा उपक्रम. ईद निमित्ताने निफाड येथे इरफान भाई सेवाभावी संस्थेच्या वतीने शीरखुर्मा पार्टीचे आयोजन आणि एकतेचा संदेश देणाऱ्या या पवित्र सणानिमित्त निफाड येथे एक सुंदर सामाजिक उपक्रम राबविण्यात आला,....

मंगळवार, दिनांक २४ मार्च २०२६ रोजी दुपारी १ ते सायंकाळी



करण्यात आले होते यावेळी सर्व जाती-धर्माच्या नागरिकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेऊन शीरखुर्माचा आनंद लुटला,आनंद, प्रेम ६ वाजेपर्यंत सरकार बिल्डिंग (तुळजा भवानी देवी मंदिर मागे), उगाव रोड, येथे हा कार्यक्रम पार पडला असून या उपक्रमामागील मुख्य उद्देश म्हणजे ईदचा आनंद सर्वांनी मिळून साजरा करणे आणि समाजात बंधुभाव वाढवणे हा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून

या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, या प्रसंगी मा. आ. अनिल कदम, उपनगराध्यक्ष अनिल पा, कुंदे ,नगरसेवक सागर पा. कुंदे ,किरण कापसे, साहेबराव बर्डे ,किशोर ढेपले, मुकुंद होळकर, नंदलाल चोरडिया, रमेश घुगे ,मधुकर शेलार ,संजय गाजरे ,गणेश कापसे, संपत व्यवहारे, संजय कुंदे,नंदू काका पानगव्हाणे ,खंडू बोडके, अशोक फोपळीया, आदी सर्व मान्यवर उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नगरसेवक जावेद शेख, तन्वीर राजे, ऍडव्होकेट फिरोज इनामदार, दबीर पटेल, शाकीर शेख, आदींनी परिश्रम घेतले

# पंढरपूरच्या विद्यार्थ्यांनी अनुभवले विधानसभेचे कामकाज

**शिक्षण मंत्री भुसे यांनी आमदार अभिजीत पाटील यांचे केले कौतुक**

**आमदार अभिजीत पाटील यांच्या पुढाकारातून पंढरपूर व माढा तालुक्यातील विद्यार्थांनी केले मुंबई दर्शन**





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी नुकतीच विधान भवन येथे सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे कामकाज प्रेक्षक गॅलरीतून प्रत्यक्ष पाहून लोकशाही प्रक्रियेचा अनोखा अनुभव घेतला. सभागृहातील कामकाज कशा पद्धतीने चालते, लोकप्रतिनिधी जनतेचे प्रश्न कसे मांडतात आणि राज्याच्या विकासासाठी निर्णय कसे घेतले जातात, याची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या मुंबई भेटीबाबत माहिती देताना आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले की, प्रत्येकालाच मुंबई या शहराचे आकर्षण असते. आयुष्यात एकदा तरी मुंबई पाहण्याची इच्छा प्रत्येकाच्या मनात असते. या शहरातील अनुभवांमुळे विद्यार्थ्यांच्या विचारांना नवे आयाम मिळतात, स्वप्नांना पंख फुटतात आणि मोठी ध्येये गाठण्याची प्रेरणा मिळते.

जिल्हा परिषदेतील शाळेतील सर्वसामान्य विद्यार्थ्यांना गुणवंत विद्यार्थ्यांना विविध सभा व विधान परिषदेतील कामकाज दाखवण्यासाठी व मुंबई दर्शन करण्यासाठी आमदार अभिजीत पाटील यांनी घेतलेला पुढाकार हा कौतुकास्पद असून मी देखील माझ्या मतदारसंघातील जिल्हा परिषदेतील मुलांना घेऊन येण्याचा संकल्प केला असल्याचे शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी उद्गार काढले.

ग्रामीण भागातील विद्यार्थी जेव्हा पहिल्यांदाच मुंबईसारख्या मोठ्या शहरात येतात, तेव्हा त्यांच्या डोळ्यांतील आनंद, उत्साह आणि उंच भरारी घेण्याची स्वप्ने खरोखरच प्रेरणादायी असतात. भविष्यात हेच विद्यार्थी उच्च अधिकारी किंवा लोकप्रतिनिधी बनून अशाच सभागृहात काम करताना दिसावेत, अशा शुभेच्छा यावेळी देण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद त्यांच्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण ठरला असून, त्यांच्या आनंदात सहभागी होणे समाधानकारक असल्याचेही आमदार पाटील यांनी नमूद केले.

मुंबईत दिलेल्या भेटी :

या शैक्षणिक दौऱ्यात विद्यार्थ्यांनी गेटवे ऑफ इंडिया, मंत्रालय, नरिमन पॉईंट, वानखेडे स्टेडियम तसेच विविध राजकीय नेत्यांची शासकीय निवासस्थाने, उद्योजकांचे बंगले, अभिनेत्यांची घरे आणि खाऊगल्ली यांना भेट दिली. मुंबईतील उंचच उंच इमारती पाहून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्य आणि कुतूहल स्पष्ट दिसून येत होते.

**फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १६३ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न**

# ज्यांच्यासाठी संघटन चालवायचे आहे, त्यांच्याच संसाधनाचा वापर केला पाहिजे : बी. बी. मेश्राम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघाच्या संयुक्त विद्यमाने श्रीमंताच्या पैशावर जर पक्षाचे कार्य चालू लागले तर पक्षाचे वैशिष्ट्य नष्ट होईल. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ८८ व्या वर्धापन दिनानिमित्त सदरील ऐतिहासिक, प्रासंगिक विषयावर १६३ वी शतकोत्तर मोफत वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संस्थेचे कार्यालय साकेत नगर, छत्रपती संभाजीनगर येथे २२ मार्च २०२६ ला संपन्न झाली.



फुले, शाहू, आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, ज्यांच्यासाठी संघटन चालवायचे आहे, त्यांच्याच संसाधनाचा वापर आपण केला पाहिजे जेणेकरून त्यांना सदरील कार्याविषयी आस्था वाटत राहील. २७ मार्च १९३८ ला स्वतंत्र मजूर पक्षाच्या सर्वसाधारण सभेत नायगाव मुंबई येथे बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, आपण ठरविले तर महान कार्य करू शकतो. कार्यालयात काम करणाऱ्या कामगाराना त्यांनी आपल्या संघटनात्मक कार्याचे श्रेय दिले होते. त्यांनी महिलावर फार विश्वास व्यक्त केला होता, महिला संघटनात्मक कार्यात सहभागी झाल्या तर कुटुंबातील इतर सदस्य लवकरात लवकर सहभागी होऊ शकतील. म्हणून आपण सकुशल संघटकाची भूमिका पार पाडली पाहिजे. सदरील परिसरात लाखो कामगार राहत असताना केवळ चार हजार कामगारांनी सदस्यत्व स्वीकारणे याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली होती. त्यासाठी स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहीरनाम्याप्रमाणे भूमिका पार पाडली पाहिजे. शत्रु पक्षातील माणसे वंचित मुलनिवासी बहुजन समाजातील अडचणीत असणाऱ्या कार्यकर्त्यांना सावजाप्रमाणे शोधत होत असतात, त्यांना अडचणीत मदत करण्याचे आश्वासन देत असतात.

अशावेळी त्यांनी बळी न पडता गरिबांच्या पैशावर पक्ष संघटना आपण चालविल्या पाहिजेत. आपल्या सत्कार्यास फार विरोध होणारच आहे, याची जाणीव ठेवून आपण कार्य केले पाहिजे. म्हणून बाबासाहेब म्हणतात की, श्रीमंताच्या पैशावर जर पक्षाचे कार्य चालू लागले तर पक्षाचे वैशिष्ट्य नष्ट होईल. याची तीव्रता जनतेच्या लक्षात यावी म्हणून जाणीव जागृतीच्या अनुषंगाने आपण सदरील विषयावर कार्यशाळेचे आयोजन केलेले आहे.

उद्घाटनपर मार्गदर्शन करतांना ॲड. सुनीलकुमार नागवंश म्हणाले की, भांडवलदारांचे कर्ज एन. पी. ए. झाल्यानंतर कालांतराने माफ केले जातात. ज्यांचे कर्ज माफ केले जाते, ते भांडवलदार त्यांना पैसा पुरवत असतात. दारूबंदी कायदा असला तरी दारूबंदी न करता राजरोसपणे विक्री केली जाते. बेकायदेशीरपणे मिळवलेल्या पैशाच्या बळावर चळवळ चालवू नये. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पट्टेबहादूर व दिलीप कुमार यांच्याकडून देऊ केलेले अर्थसहाय्य नाकारले होते. भाकरीचा चंद्र शोधण्यात यांच्या आयुष्य बर्बाद झाले, ते चळवळ चालवत आहेत, मात्र लाभार्थी कोसो दूर आहेत.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना समन्वयक इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले की, संघटनात्मक जमाखर्चाचा विचार करता आपण आपल्या पक्ष संघटना चालविल्या पाहिजेत असे बाबासाहेब म्हणाले होते. अनैतिक मार्गातून मिळविलेल्या पैशाचा संघटनेसाठी वापर करू नये. म्हणून महिलांना बाबासाहेबांनी त्यांच्या कार्याविषयी तंबी दिली होती. दिलीप कुमार यांनी देणगी द्यायचे जाहीर केले होते. ते आर्थिक सहकार्य बाबासाहेबांनी नाकारले होते. कारण आपल्या आया बहिणींना स्टेजवर नाचवून मिळविलेला पैसा नको होता. याची आपण दखल घेतली पाहिजे.

याप्रसंगी उद्योजक मिलिंद बागुल म्हणाले की, भांडवलदाराच्या पैशावर विविध राजकीय पक्ष निवडणूक लढवीत असतात त्याला आपण बळी पडू नये. परिणामी सत्ताधीश त्यांना विविध योजनात सहभागी करून घेतात ज्यात ते दिलेली रक्कम वसुल करीत असतात. करिता स्वबळावर स्वतःचे अस्तित्व निर्माण केले पाहिजे. याचाच एक भाग म्हणून अखिल भारतीय नाग संघाच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त संपन्न झालेल्या कार्यक्रमात श्रावस्ती येथे स्वतंत्र कार्यशाळेचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले आहे. ज्याचे परिणाम आपणाला येणाऱ्या काळात पाहायला मिळतील. साधू आनंद म्हणाले की, यशाचे टोक दूर असले तरी मुशाफिर प्रमाणे आपण चालत राहिले पाहिजे.

सुरुवातीला आदर्शांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून स्टडी फाउंडेशनच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. विलास कटारे यांनी तर साधू आनंद यांनी आभार व्यक्त केले.

# सीना-माढा उपसा सिंचन योजना सुरूच राहणार

## आमदार अभिजीत पाटील यांच्या पुढाकारातून ना.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी फोनवरून संपर्क करून अधिकाऱ्यांना दिले आदेश





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सध्या काही लोक अफवा पसरवून, शेतकऱ्यांना वेटीस धरत असल्याचे दिसत आहेत, तरी कोणीही कोणत्याही भूलथापांना किंवा अफवांवर विश्वास ठेवू नये, शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत टेल टू हेड पाणी पोचेपर्यंत आम्ही कटिबद्ध असल्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले

माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची विधानभवनात भेट घेऊन सीना -माढा उपसा सिंचन योजना बंद न करण्याबाबतचे पत्र दिले असता, योजनेवर मोठ्या प्रमाणावर पाणीपट्टी थकीत असली तरी हि योजना परिसरातील शेतकऱ्यांसाठी जीवनदायी ठरत असल्याचे सांगितले.

हि योजना बंद झाल्यास शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार असल्याची बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर याची तात्काळ दखल घेत विखे-पाटील साहेबांनी लगेचच फोनवरून संबंधित अधिकाऱ्यांना योजना सुरू ठेवण्याचे स्पष्ट आदेश दिले.

या योजनेतून टेल टू हेड शेतकऱ्यांना पाणी मिळेपर्यंत सुरळीत चालणार असल्याची नोंद सर्व शेतकरी बांधवांनी घेण्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले.

# उजनी धरणातील गाळाचे सर्वेक्षण करण्यासाठी ५१ लाखाची निविदा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : उजनी धरणामध्ये गाळा साठ्याचे प्रमाण वाढले आहे त्यामुळे पाण्याची प्रमाण उजनी कमी झाले आहे. त्यामुळे उजनी धरणातील गाळ काढण्याचे जलसंपदा विभागाने निर्णय घेतला आहे. तिसऱ्यांदा गाळ काढण्याचे सर्वेक्षण निविदा काढण्यात आली आहे. सर्वेक्षण करण्यासाठी गाळ काढण्यासाठी ५१ लाख हजार रुपयांची निविदा काढण्यात आली आहे.

उजनी धरणात मोठ्या प्रमाणात गाळ असल्यामुळे तू गाळ काढण्यासाठी २००२ ते २००७ स** सर्वेक्षण करण्यात आले आहे. यामध्ये धरणामध्ये १२.७७% गाळ असल्याने दिसून आले होते. त्यानंतर २०११ स** विशेष तंत्रज्ञानाच्या साह्याने गाळाची पाणी करण्यात आली तेव्हा २७.९४ टक्के गाळ असल्याचे आढळून आले त्यामुळे धरणामधील गाळ काढण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने घेतला आहे. सुमारे ५१ लाख ५१ हजाराची निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. उजनीतील गाळ काढल्यामुळे धरणातील पाणीसाठा वाढणार आहे. याचा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे. गाळ काढण्याची अशी मागणी होऊ लागली आहे.

# मोहा येथे श्री राम जन्मोत्सवानिमित्त कार्यक्रम




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मोहा प्रतिनिधी/प्रविण कसबे : कळंब तालुक्यातील मोहा येथील रामराज्य चौक येथे श्री राम जन्मोत्सवानिमित्त पंच्याहत्तर वर्षाच्या अमृत महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दि.२३ मार्च रोजी ९ते १० या वेळेत समाजप्रबोधनकार ह .भ. प. निवृत्ती इंदोरीकर महाराज यांचा प्रबोधात्मक किर्तनाचा कार्यक्रम संपन्न झाला. ह.भ.प.निवृती महाराजांच्या किर्तनाने भक्तीमय व उत्साही वातावरण बनले होते. तरुण मंडळीसह महिला व आबालवृद्धांनी हाजारोंच्या संख्येने उपस्थिती लावली होती.या प्रबोधात्मक किर्तनाने भक्तीमय, उत्साही वातावरण बनले होते.या कार्यक्रमाचे आयोजन अमर राजेंद्र मडके (तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी) व पांडुरंग मडके (शिवसेना उ.बा.ठा.) यांनी केले होते.तसेच श्री राम जन्मोत्सव सोहळ्या निमित्त दि. २६ व२७ मार्च रोजी भरगच्च धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. २६ मार्चला ह.भ.प. बापूदेव जोशी महाराज मोहा यांचे १०ते १२ या वेळेत तर दि.२७ मार्चला ह.भ.प. वैराग्य मुर्ती दत्तनाना महाराज अंबिरकर यांचे काल्याचे किर्तन सकाळी १०ते१ या वेळेत होणार आहे.भाजप जिल्हा चिटणीस संताजी वीर व सर्व गावकऱ्यांनी श्री राम जन्मोत्सव सोहळ्या निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन केले आहे.

# महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास मंडळ म्हणजे टेंडर मॅनेज करणारी यंत्रणा; आमदार कैलास पाटील यांचा खळबळजनक दावा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव : महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळ हे फक्त टेंडर मॅनेज करणारी यंत्रणा असल्याचा खळबळजनक दावा आमदार कैलास पाटील यांनी सभागृहात केला. यातील अधिकारी म्हणजे कलेक्शनची यंत्रणा असल्याचं त्यांच्या कामावरून दिसतं असाही आरोप आमदार पाटील यांनी विधानसभेत बोलताना केला.

यावेळी आमदार पाटील म्हणाले की, सार्वजनिक बांधकाम विभागाचे ८ हजार अभियंते असताना पुन्हा नव्याने महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास मंडळ स्थापन करण्याच नेमकं कारण काय हे आजवर न उघडलेलं कोड आहे. मनुष्यबळ कमी तर कामे जास्त अशी अवस्था मंडळाची आहे. सध्या मंडळाकडून ३७ हजार कोटीची काम सुरू आ-हेत. हे कमी की काय त्यांनी ऊसतोड मजूर यांच्या वसतिगृह बांधकामाची कामे घेतली आहेत. एवढेच नाही तर काही मेडिकल कॉलेजच्या बांधकामाचीही कामे त्यांनी घेतल्याचं दिसत आहे. विशेष म्हणजे केंद्र शासनाच्या अखत्यारित असलेल्या यंत्रणेकडून ही कामे केली जातात तरीही या मंडळाकडे ही कामे सोपवण्याची आवश्यकता सरकारला का वाटली? असा सवाल आमदार कैलास पाटील यांनी सभागृहात उपस्थित केला.

मुंबई स्थित एक कार्यालय तिथं बोटावर मोजण्याइतके मनुष्यबळ तर प्रत्येक विभागाला एक किंवा दोन कार्यकारी अभियंता अशी तोकडी यंत्रणा असतानाही त्यांना एवढ्या मोठ्या प्रमाणात कामे देण्याचा घाट सरकार का घालत आहे? केलेल्या कामाची पाहणी करणे देखील यंत्रणेला शक्य नाही तरीसुद्धा हे सरकार मंडळावर मेहरबान का आहे अशी विचारणा आमदार कैलास पाटील यांनी केली.

यांनी कामाच्या ज्या निविदा काढल्या आहेत त्यामध्ये एकही काम निविदा रक्कम पेक्षा कमी नाही. निविदा प्रक्रियेमध्येच नियम करण्यात आलेला आहे की जर निविदा कमी दराने आल्यास साडेसात टक्के इतकी बँक गॅरंटी त्या एजन्सी कडून घेतली जाणार आहे. अशी अट सरकारने या कामांसाठी का लावली शिवाय राष्ट्रीय महामार्गाची जी कामे होतात ती सुद्धा ४० ते ४५ टक्क्यापर्यंत निविदा रक्कमेपेक्षा कमी असतात. केंद्र सरकारचे मंत्री नितीन गडकरी हे सुद्धा या पद्धतीने रस्त्याची कामे करत असताना आपल्या सरकारला निविदा रक्कमेपेक्षा कमी कमी दराने कामे करता येणार नाहीत का याचे उत्तर सरकारने द्यावे अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी सभागृहात केली. या ठिकाणी असलेले अधिकारी हे फक्त कलेक्शन अधिकारी असल्यासारखे वाटतात त्यांची कोणतीही भूमिका कामाप्रती दिसत नाही त्यामुळे हा सर्व प्रकार भ्रष्टाचाराला खतप-णी घालण्याचा आहे. त्यामुळे सुशासन म्हणणाऱ्या मुख्यमंत्री यांनी याबाबतीत खुलासा करणे आवश्यक आहे असे मत आमदार पाटील यांनी व्यक्त केले.

# जिद्द, मेहनत आणि स्वप्नपूर्तीचा प्रवास : नैताळेच्या सोनाली बोरगुडेची जळगाव पोलिस दलात निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड / प्रतिनिधी : नैताळे येथील शेतकरी कुटुंबातील मुलगी कुमारी सोनाली बाळासाहेब बोर-गुडे हिने आपल्या जिद्दीच्या बळावर यशाचे शिखर गाठत जळगाव पोलिस दलात निवड मिळवून गावाचे नाव उज्ज्वल केले आहे.

कांदा, सोयाबीन व मका उत्पादक शेतकरी बाळासाहेब बोरगुडे व आशा बोरगुडे यांच्या कुटुंबातील सोना-लीने अत्यंत साध्या परिस्थितीतून मोठे स्वप्न पाहिले आणि ते प्रत्यक्षात उतरवून दाखवले.सोना-लीने बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा निर्धार केला. आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आणि उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी तिने नाशिक येथील एका अकॅडमीत प्रवेश घेतला. कठोर मेहनत, सातत्यपूर्ण अभ्यास आणि योग्य मार्गदर्शन यांच्या जोरावर तिने पोलिस भरतीची तयारी केली.

अनेक अडचणींना सामोरे जात, आत्मविश्वास न ढळू देता सोनालीने प्रयत्न सुरूच ठेवले. अखेर तिच्या परिश्रमांना यश मिळाले आणि तिची जळगाव पोलिस दलात निवड झाली. या यशामुळे बोरगुडे कुटुंबात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून संपूर्ण नैताळे गावाला अभिमान वाटत आहे.तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल नैताळे येथे तिचा सत्कार करण्यात आला. गावातील विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून तिचे अभिनंदन केले. मेहनत आणि जिद्द असेल तर कोणतेही स्वप्न अशक्य नाही, असा संदेश सोनालीच्या यशातून युवकांना मिळत आहे.सोनाली लवकरच आपला प्रशिक्षण कालावधी पूर्ण करून पोलिस सेवेत रुजू होणार असून, भविष्यात प्रामाणिकपणे समाजसेवा करण्याचा तिचा मानस आहे. तिच्या या यशाने ग्रामीण भागातील मुलींना प्रेरणा मिळत असून, शिक्षण आणि जिद्दीच्या जोरावर कोणतीही उंची गाठता येते, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे

# सारोळा मांडवा येथील शेतकऱ्यांनी ३१ मार्च पूर्वी ई पीक पाहणी पूर्ण करावी : सिरसेवाड





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिपक क्षिरसागर/वाशी प्रतिनिधी : वाशी तालुक्यातील मौजे सारोळा मांडवा येथील शेतकऱ्यांना शासकीय योजनेचा लाभ मिळवण्यासाठी अत्यावश्यक असणारी ई पीक पाहणी सहज आणि मुदतीत पूर्ण करण्याकरता रब्बी हंगामात मिळालेल्या मुदत वाढीचा शेतकऱ्यांनी फायदा घ्यावा. व मुदतीत आपली ई पीक पाहणी पूर्ण करून होणारे नुकसान टाळावे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, वाशी तालुक्यातील मौजे. सारोळा मांडवा, सेलू येथील ग्राम महसूल अधिकारी डि.व्ही.सिरसेवाड पाटील यांनी ई पिक पाहणी बाबत शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली व आपल्या सज्जातील एकही शेतकरी ई पिक पाहणी मुळे हमी भाव, इतर शासकीय योजनेचा लाभ घेण्याकरिता कोणीही वंचित राहू नये. याकरिता गावात दोन सहाय्यकाची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच सहाय्यकांना गेल्यावर्षीचे मानधन देखील वितरित करण्यात आले नाही तरी सर्व शेतकरी बांधवांनी सहाय्यकामार्फत आपल्या शेतातील रब्बी हंगामातील ई पीक पाहणी ३१ मार्च पूर्वी पूर्ण करून घेण्याचे आवाहन ग्राम महसूल अधिकारी डी.व्ही. सिरसेवाड पाटील यांनी केले आहे.

### ऑनलाईन पूजा नोंदणी अल्पावधीत पूर्ण; भाविकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग

### संकेतस्थळावर जर्मनी, कॅनडा, नेपाळ, चीन आदी सुमारे २० देश विदेशातून सुमारे १७००० व्ह्यूज नोंदविले,

# विठ्ठल रुक्मिणी मातेच्या पूजा नोंदणीस भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर यांच्या वतीने भाविकांना अधिक सुलभ व पारदर्शक सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या विविध पूजांसाठी ऑनलाईन नोंदणी प्रणाली सुरू करण्यात आली आहे. दि. ०१ एप्रिल ते ३१ जुलै २०२६ या कालावधीतील पूजांसाठीची ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया दि. २५ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून सुरू करण्यात आली असून या उपक्रमास भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.

मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळामार्फत भाविकांना घरबसल्या पूजेची नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सुरू करण्यात आलेल्या या प्रणालीमुळे राज्यासह देशातील विविध भागांतील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेमुळे भाविकांचा वेळ व श्रम वाचले असून पूजेच्या आरक्षणात पारदर्शकता निर्माण झाली आहे.

दि. १ एप्रिल ते ३१ जुलै, २०२६ या कालावधीतील सण, उत्सव व गर्दीचे दिवस वगळून इतर दिवशीच्या श्रींच्या नित्यपूजा, पाद्यपूजा व महानैवेद्य सहभाग योजना तसेच माहे एप्रिल, २०२६ मधील तुळशी अर्चन पूजा ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. त्यामध्ये सर्व पूजांची नोंदणी अल्पावधीत पूर्ण झाली आहे. यामध्ये श्री विठ्ठल नित्यपूजा - १४८, श्री रुक्मिणीमाता नित्यपूजा - १५०, पाद्यपूजा - ३५४, तुळशी अर्चन पूजा - १०४० तसेच महानैवेद्य सहभाग योजना - १४५ अशा सर्व पूजांसाठी भाविकांनी मोठ्या उत्साहाने नोंदणी केली आहे.

श्री विठ्ठल व श्री रुक्मिणीमातेच्या नित्यपूजेसाठी अनुक्रमे रु.२५०००/-, रू.११०००/- तसेच पाद्यपूजेसाठी रू.५०००/- व तुळशी अर्चन पूजेसाठी रू.२१००/- तसेच महानैवेद्य सहभाग योजनेसाठी रू.७०००/- इतके देणगी मुल्य आहे. यामधून सुमारे ८८ लक्ष इतके देणगीमूल्य जमा झाले आहे.

या ऑनलाईन प्रणालीमुळे मंदिर समितीच्या सेवांमध्ये सुलभता, पारदर्शकता आणि कार्यक्षमतेत वाढ झाली असून भाविकांना अधिक सोयीस्कर पद्धतीने सेवा उपलब्ध होत आहेत. भाविकांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेता भविष्यातही अशा तंत्रज्ञानाधारित सुविधा अधिक प्रभावीपणे राबविण्याचा मंदिर समितीचा मानस असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून युनायटेड स्टेट्स, युनायटेड किंगडम, युनायटेड अरब अमिराती, जर्मनी, कॅनडा, नायजेरिया, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया, नेदरलँड, नेपाळ, हंगेरी, नॉर्वे, काँगो (किन्शासा), फ्रान्स, कुवेत, स्वीडन, चीन, श्रीलंका आदी सुमारे २० देशांमधून संकेतस्थळास भेटी (व्ह्यूज) प्राप्त झालेल्या असून देश-विदेशातून एकूण सुमारे १७,००० व्ह्यूज नोंदविण्यात आले आहेत.

सदर ऑनलाईन प्रणालीद्वारे नोंदणी झालेल्या पूजांबाबतचा संपूर्ण डेटा, संबंधित लोकेशन माहिती, आयपी अॅड्रेस, फेल्ड (अयशस्वी) नोंदणीचा तपशील तसेच इतर अनुषंगिक तांत्रिक माहिती मंदिर समितीकडे उपलब्ध असून त्याची संगणकीय नोंद सुरक्षित स्वरूपात ठेवण्यात आलेली आहे. संपूर्ण पूजा नोंदणी प्रक्रिया अत्यंत पारदर्शक, संगणकीकृत व नियमानुसार पार पडलेली आहे. सदरची संगणक प्रणाली टाटा कन्सल्टंट सर्व्हिसेस यांच्याकडून विकसित करण्यात आली आहे. पूजा नोंदणी प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार अथवा घोटाळा झालेला नाही.

तथापि, काही वर्तमानपत्रांनी विठ्ठल-रुक्मिणीच्या पूजेचा काळाबाजार या मथळ्याखाली कोणतीही शहानिशा अथवा वस्तुस्थितीची पडताळणी न करता बातमी प्रसिद्ध करून मंदिर समितीची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सदर बाब गंभीर स्वरूपाची असून संबंधित वर्तमानपत्राच्या संपादकास कायदेशीर नोटीस देण्याची तसेच आवश्यकतेनुसार पुढील कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी श्री राजेंद्र शेळके यांनी सांगितले.